**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**
**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.**
**Ph.No :** (0721) 2573027, 2572577 **Website:** www.jdroamt.org
**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No:** (0721) 2577913

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /२०२४/ ३५०१
दिनांक :- 26 NOV 2024

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतने,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रमाव्दारे प्रसिध्दी करण्याबाबत.**
**संदर्भ :-** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एनजीपी/प्रवेश/स्कुल कनेक्ट २०२५-२६/५५४ दिनांक २५ नोव्हेंबर २०२४.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ होण्यासाठी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मार्गदर्शनाखाली तसेच संचालनालयाव्दारे वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ व राज्यातील तंत्रनिकेतनामधील अध्यापकांनी **"स्कुल कनेक्ट"** च्या माध्यमातुन विविध सकारात्मक उपक्रम यशस्वीपणे राबविलेले आहे.

मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण व मा. प्रधानसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार सर्व शासकीय व अनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये १०० टक्के प्रवेश होण्याच्या दृष्टीने **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रमाव्दारे प्रसिध्दी करण्याबाबतचे** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे संदर्भिय पत्र जोडलेले आहे. कृपया त्याचे अवलोकन करुन त्यामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

तसेच याबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश वाढविण्यासाठी स्कुल कनेक्ट हा उपक्रम दिनांक २८/११/२०२४ पासून सुरु करण्याबाबतचे मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे संदर्भिय पत्रान्वये दिलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

**(मनोज म. अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण.
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४३०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक : १० / एनजीपी / प्रवेश / स्कूल कनेक्ट २०२५-२६ / ५५४ दिनांक : 25 NOV 2024

प्रति,

१. संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

२. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/छ.संभाजीनगर/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रमांव्दारे प्रसिध्दी करणेबाबत....

पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्यासाठी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मार्गदर्शनाखाली तसेच संचालनालयाव्दारे वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ व राज्यातील पॉलिटेक्निकमधील अध्यापकांनी "स्कुल कनेक्ट" च्या माध्यमातुन विविध सकारात्मक उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ च्या प्रवेशासाठी स्कूल कनेक्ट उपक्रमाद्वारे पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ करण्यासाठी समुपदेशन सभा, जनजागृती मोहीम इत्यादी कार्यक्रमांद्वारे, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याची प्रक्रिया नोव्हेंबर २०२३ मधेच सुरु झालेली होती. या सर्व गोष्टींचा एक सकारात्मक परिणाम प्रवेश प्रक्रियेवर होत आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ४१ टक्के असलेली पदविका अभ्यासक्रमांच्या एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांची टक्केवारी दरवर्षी सातत्याने वाढत जावून आज शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ९० टक्के एवढी झालेली आहे. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या टक्केवारीत सातत्याने वाढ होत आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ९५,५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. सर्व संस्थांनी व अध्यापकांनी निश्चितच कौतुकास्पद कामगिरी केलेली आहे.

मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण व मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार सर्व शासकीय व अनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये १०० टक्के प्रवेश होण्याच्या दृष्टीने प्रत्येक संस्थेच्या प्राचार्यांनी पुढाकार घेऊन, संस्थेतील अध्यापकांच्या सहकार्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ मध्ये पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश वाढविण्यासाठी स्कूल कनेक्ट हा उपक्रम दिनांक २८.११.२०२४ पासून सुरु करण्यात यावा.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रमांव्दारे प्रसिध्दी करताना खालील मुद्यांचा समावेश करण्याबाबत सूचना आपल्या अखत्यारीतील शासकीय व अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतनांच्या प्राचार्यांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी पदविका प्रवेशाकरीता संभाव्य विद्यार्थ्यांसाठी व त्यांच्या पालकांसाठी करीअर फेअरचे आयोजन करावे. त्यामध्ये मुख्यत्वे करुन अभियांत्रिकी / वास्तुकला क्षेत्रातील संधी व पदविका अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर उपलब्ध असलेल्या संधी याबाबत विविध माध्यमांव्दारे पदविका प्रवेशासाठी जनजागृती करावी. इयत्ता १० वी चे विद्यार्थी कमी वयाचे असल्यामुळे त्यांच्यावर पालकांच्या विचारांचा मोठा प्रभाव असतो. त्यामुळे मागील वर्षीप्रमाणे या वर्षीसुध्दा सदर कार्यक्रमास विद्यार्थ्यांच्या पालकांनासुद्धा निमंत्रित करावे.



शिक्षण
26/11/24

स्कूल कनेक्ट उपक्रमा अंतर्गत विद्यार्थी, पालक यांच्यासाठी मेळावे आयोजित करावेत. या मेळाव्यास उपस्थित असलेल्या विद्यार्थी व पालकांची माहिती गोळा करावी. विद्यार्थी व पालकांना समजतील असे विषय करीअर फेयर कार्यक्रमात ठेवून, त्याप्रकारे रचना करून कार्यक्रम आयोजित करावा व तशाच प्रकारे पार पाडावा.

२. शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन स्कूल कनेक्ट उपक्रम विद्यार्थी व पालकांसाठी राबविण्यात यावा.

३. संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हा परिषेदेचे शिक्षणाधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक तसेच शाळेतील मोजके शिक्षक यांच्या एकत्रित सभा संबंधित तंत्रनिकेतनांच्या प्राचार्यांमार्फत ( Online / Offline ) आयोजित करुन पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत जनजागृती करण्यात यावी. तंत्र शिक्षणातील विविध संधीची त्यांना कल्पना देऊन वेगाने होत असलेल्या बदलांचा विद्यार्थ्यांना फायदा होऊन त्यांचे भविष्य कसे उज्वल होईल हे विद्यार्थी व पालकांच्या तसेच जिल्हा परिषेदेचे शिक्षणाधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक व शाळेतील शिक्षक यांच्या नजरेस प्राधान्याने आणून द्यावे.

४. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षणासाठी मातृभाषेची ताकद नमूद करण्यात आली आहे, यास अनुसरुन पदविका अभ्यासक्रम हा " मराठी-इंग्रजी (व्दिभाषिक)" स्वरुपामध्ये तंत्रनिकेतनांमध्ये राबविण्यात येत आहे. विद्यार्थी त्यांच्या पसंतीनुसार असा विकल्प प्रवेश अर्ज भरतांना निवडू शकतात. शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये एकुण प्रवेशित विद्यार्थ्यांच्या ४१ टक्के विद्यार्थी हे " मराठी - इंग्रजी (व्दिभाषिक ) " माध्यमामध्ये प्रवेशित झालेले आहेत. विद्यार्थ्यांना इंग्रजीव्यतिरिक्त मराठी भाषेमध्ये अभियांत्रिकीचे शिक्षण सुलभ व्हावे याकरीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (एआयसीटीई) यांनी देखील पुढाकार घेतलेला असून एआयसीटीई व्दारे पदविका अभ्यासक्रमांच्या पुस्तकांची मराठी भाषेत निर्मिती करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत देखील मराठी भाषेत निवडक विषयांची शैक्षणिक साधन सामुग्री उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ही सर्व पुस्तके / साधन सामुग्री महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्या संकेतस्थळावर निशुल्कपणे विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध आहेत.

५. राज्यातील महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नीत, तसेच स्वायत्त अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये NEP- २०२० नुसार नविन "K-Scerne" अभ्यासक्रम राबविला जात आहे. औद्योगिक क्षेत्राच्या, उद्योगधंद्यांच्या गरजा विचारात घेऊन, भारतीय ज्ञानपरंपरांचा (Indian Knowledge System) विविध विषयांमध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे. तसेच राष्ट्रीय व प्रादेशिक गरजांची पूर्तता करण्याकरिता लागणाऱ्या तंत्रज्ञानाचा व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता बहु शाखिय विषयांचा तसेच भारतीय संविधानावर (Indian Constitution) आधारीत मुद्यांचा अंतर्भाव केला आहे. डिजिटल मिडिया म्हणजेच Massive Open Online Courses (MOOCs) चा प्रभावी उपयोग करण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणारा व विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाची सवय लावणारा परिणाम आधारित (Outcome Based) क्रेडिट सिस्टम वर आधारित अभ्यासक्रम विकसित करण्यात आला आहे. नवीन K-Scheme च्या अभ्यासक्रमांची ठळक वैशिष्ट्ये नमूद करण्यात यावीत. सदर अभ्यासक्रमात मल्टीपल एन्ट्री - मल्टीपल एक्झिट ची तरतूद असून प्रथम वर्षाअंती एक्झिट केलेल्या विद्यार्थ्यांना Certificate of Vocation, व्दितीय वर्षाअंती Diploma in Vocation व तृतीय वर्षाअंती Diploma in Engineering ही पदविका देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

६. उद्योगांच्या गरजांनुसार अभ्यासक्रमात सुधारणा करण्यात आली असून त्यासाठीच्या समितीवर औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधी नियुक्त केले आहेत. सध्या औद्योगिक क्षेत्रांमधील आवश्यक गरजा आणि भविष्यातील संधींचा वेध घेऊन संस्थेमध्ये न्यू इमर्जिंग टेक्नॉलॉजी संबंधित अभ्यासक्रम व कौशल्य विकास वृद्धीसाठी अभ्यासक्रम सुरु

केले गेले आहेत. Experiential Learning या संकल्पनेचे महत्व लक्षात घेऊन राज्यात पदविका अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षापासून अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी मायक्रो प्रकल्प अनिवार्य केले आहे. अभ्यासक्रमात सुधारणा करताना उद्योगांच्या आवश्यकतांचे, त्यांच्याकडून प्राप्त सूचनांचे विश्लेषण केलेले आहे. पदविका अभ्यासक्रमांसाठी चौथ्या सत्रानंतर सर्व विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण (Internship) अनिवार्य केले आहे. तंत्र शिक्षण संस्थातील विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता (Entrepreneurship) वाढविण्याच्या दृष्टीने संस्थेमध्ये Incubation Center स्थापन केले गेले आहे. तसेच राज्यातील काही तंत्रनिकेतनांमध्ये The Center of Excellence (CoE) ची निर्मिती करण्यात आलेली आहे. या सर्व बाबींचा एकत्र परिणाम होऊन तंत्र शिक्षण पदविका अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढला आहे. त्याचा परिपाक म्हणून पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांमध्ये प्रवेश वाढत आहेत व विद्यार्थ्यांना सहजपणे रोजगार उपलब्ध होत आहे. या सर्व गोष्टींचा विद्यार्थ्यांना फायदा होऊन त्यांचे भविष्य उज्वल होईल व ते रोजगारक्षम, बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे व उद्यमशील बनतील. या बाबी सुद्धा विद्यार्थी व पालकांच्या प्राकर्ष्याने नजरेस आणून द्याव्यात.

७. तंत्र शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता (Entrepreneurship) वाढविण्याच्या दृष्टीने तसेच त्यांना रोजगारक्षम करण्यासाठी विद्यार्थ्यांना उद्योगात प्रशिक्षण घेण्यास प्रोत्साहित केले जाते आणि त्यानुसार अदानी थर्मल पावर स्टेशन, एल अँड टी, सिमेन्स इंडिया लिमिटेड, मर्सिडीज बेन्ज, यामाहा, महिंद्रा अँड महिंद्रा यासारख्या उद्योगांचे प्रशिक्षण कार्यक्रम प्राध्यापक वर्ग व विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले जात आहेत. यशदा पुणे, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे आणि एन.आय.टी.टी.आर. भोपाळ व पुणे येथील विस्तार केंद्र येथे प्राध्यापक प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येत आहेत. संचालनालयाने टाटा, रिलायन्स, महिंद्रा आणि महिंद्रा, लार्सन अँड टुब्रो, इन्स्टिट्यूट ऑफ एअरक्राफ्ट इंजिनीअरिंग या सारख्या नामवंत कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले आहेत जेणेकरून या माध्यमातून अभ्यासक्रम, अध्यापकांचे प्रशिक्षण, कौशल्य विकास / रोजगार या बाबत औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन, इंटर्नशिप इत्यादी द्वारा अध्यापनाचा दर्जावाढ करण्यास मदत होत आहे. या बाबी विद्यार्थी व पालकांना समजावून सांगाव्यात. तसेच राज्यातील विद्यार्थी व अध्यापक यांना अद्यावत अभ्यासक्रम व प्रशिक्षण यासाठी संचालनालयाने इन्फोसिस या आयटी क्षेत्रातील नामांकित कंपनीबरोबर व नॅसकॉम सोबत सामंजस्य करार केलेला आहे. राज्यातील तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांना इंग्रजी सवांद / कौशल्ये, मुल्याधारीत जीवनशैली अभ्यासक्रमातून शिकविण्याच्या द्रष्टीने देखील इन्फोसिस यांच्यामार्फत CSR अंतर्गत, एसजीबीएस उन्नती फाऊंडेशन, बेंगळूरू या एनजीओसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. विद्यार्थी सदर अभ्यासक्रम निशुल्कपणे शिकू शकतात व आपली गुणवत्ता वृध्दींगत करु शकतात, ही बाब देखील विद्यार्थ्यांना समजावून सांगावी.

८. तंत्रनिकेतनांच्या प्राचार्यामार्फत, परिसरातील शाळेच्या मुख्याध्यापकांची भेटीची वेळ निश्चित करणे, तंत्रनिकेतनांचे सादरीकरण (PPT) करणे, पत्रके वाटणे, शाळेतील मुलांची तंत्रनिकेतनांमध्ये भेट आयोजित करणे, शाळेतील मुलांना तंत्रनिकेतनांमधील लॅब, क्लासरूम, प्रोजेक्ट, विस्तृत परिसर, प्लेसमेंट दाखवणे, शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची उद्योगधंद्यांमध्ये भेट घडविणे, गावोगावी जाऊन करिअर फेअर आयोजन करणे, इत्यादी.

९. विविध पदविका अभ्यासक्रम, पात्रता, प्रवेशनियमावली, ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया यांची थोडक्यात माहिती द्यावी.

१०. तंत्रशिक्षण संचालनालयाद्वारे कागदपत्रांच्या प्रत्यक्ष छाननी प्रक्रियेव्यतिरिक्त ई-स्क्रूटनीची संकल्पना कशा प्रकारे राबविण्यात येते व उमेदवार त्यांच्या सोयीनुसार छाननीची पद्धत / पर्याय कशा प्रकारे निवडू शकतात, तसेच मोबाईलवरुन अर्ज कसा भरता येतो इ. याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

११. संचालनालयामार्फत विद्यार्थ्यांच्या सोईसाठी इयत्ता १० वीचे व १२ वीचे निकाल घोषित होण्यापुर्वी प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्यास त्याअनुषंगानेसुध्दा विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात यावी. आवश्यकतेनुसार सदर सुविधा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीताही उपलब्ध करुन देण्यात येईल.

१२. प्रवेश अर्ज भरणे, अर्ज निश्चिती करणे, गुणवत्ता यादी मधील त्रुटी दुरुस्त करणे, अंतिम गुणवत्ता यादी तपासणे, विकल्प सादर करणे, कॅप जागावाटप, जागास्वीकृती करणे, जागावाटप केलेल्या संस्थेत प्रत्यक्ष जाऊन प्रवेश घेणे इत्यादी पदविका प्रवेश प्रक्रियेशी संबंधीत बाबींची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना द्यावी.

१३. शाळेमध्ये तंत्रनिकेतन व तंत्रनिकेतनातील विविध शाखांचे सादरीकरण, टीपीओ / विभागप्रमुख / शैक्षणिक प्रमुख यांचे प्रबोधन, प्रसिद्ध माजी विद्यार्थी / उद्योजक यांची विद्यार्थ्यांशी अनौपचारिक चर्चा, अशा विविध उपक्रमांचे आयोजन करणे. तसेच विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या प्लेसमेंटबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

१४. स्कूल कनेक्ट उपक्रम राबविताना, शाळेतील प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थ्यांबाबत तसेच त्यांच्या पालकासबंधित माहिती संकलित करुन सदर माहिती संस्थास्तरावर जतन करण्यात यावी. पदविका प्रवेशासाठी स्वारस्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती सविस्तर डेटाबेसच्या स्वरुपात वेळोवेळी मंडळाच्या (MSBTE) संकेतस्थळावर अपडेट करण्यात यावी व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे मोबाईल क्रमांकाचा सुध्दा त्यामध्ये समावेश करण्यात यावा. साधारणत: विद्यार्थी व पालकांविषयी तसेच संस्थेविषयीची माहिती सोबतच्या परिशिष्ट अ व ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे गोळा करण्यात यावी.

१५. सदर माहिती मंडळाच्या संकेतस्थळावर डेटाबेसच्या स्वरुपात अपडेट करतांना माहितीचे डुप्लीकेशन होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच मंडळाने त्यानुसार त्यांच्या प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करावे.

१६. स्कूल कनेक्ट उपक्रम राबविला जात असताना आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना Admission Process ची माहिती डिजीटल फॉरमॅट मध्ये उपलब्ध करुन द्यावी.

१७. महाविद्यालयांमधील अध्यापकांनी / MSBTE ने पदविका अभ्यासक्रमांसाठी तयार केलेले E-content, तसेच राबविण्यात येणाऱ्या विविध आधुनिक शिक्षण अध्यापनशास्त्र (Teaching Pedagogy) या बद्दलची माहिती देण्यात यावी.

१८. शासनामार्फत देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्त्या विषयी माहिती देऊन तंत्र शिक्षण कमी खर्चात तसेच कमी कालावधीत पूर्ण करून रोजगारक्षम तसेच उद्यमशील उद्योजक कसे बनता येईल यासंबंधी विस्तृत माहिती विद्यार्थी व पालकांना देण्यात यावी.

विद्यार्थ्यांच्या दहावीच्या परिक्षेनंतर व विद्यार्थ्यांचा दहावीचा निकाल लागल्यानंतर सुध्दा सदर प्रक्रीया सुरु ठेवण्यात यावी. शासकीय तंत्रनिकेतनांनी परिसरातील विद्यार्थ्यांचे तसेच पालकांचे समुपदेशन करावे. तंत्रनिकेतनातील अधिकारी / कर्मचारी यांनी इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणपत्रिका वाटपाचे वेळी शाळेत उपस्थित राहून पदविका प्रवेशाबाबत मार्गदर्शन करावे, तसेच विद्यार्थ्यांना व पालकांना पदविका प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे, प्रवेश सुविधा केंद्रांबाबत माहिती द्यावी व तंत्रशिक्षणासंबंधी नोकरी व्यवसायाच्या संधी याबाबत मार्गदर्शन सुध्दा करावे. तसेच याबाबत सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतनांच्या प्राचार्यांना कळविण्यात यावे व सदर कार्याचा आपल्या स्तरावरून पाठपुरावा करण्यात यावा. तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांना कळविण्यात येते की, त्यांनी स्कुल कनेक्ट उपक्रमाअंतर्गत संस्थांनी संकलीत केलेल्या विद्यार्थ्यांची

माहिती डेटाबेसच्या स्वरुपात जमा करण्यासाठी ऑनलाईन प्रणाली आवश्यक त्या बदलांसह दिनांक २८.११.२०२४ पासून कार्यान्वीत होईल, याची काळजी घ्यावी. सदर उपक्रमासाठी तयार केलेल्या प्रणालीचा लॉगीन आयडी आणि पासवर्ड संचालनालयातील कार्यासन क्रमांक ३ व कार्यासन क्रमांक १० यांना उपलब्ध करुन द्यावा. मंडळाने या उपक्रमासाठी तंत्रनिकेतनांच्या निवडीबाबतची कार्यवाही पुर्ण करावी. तसेच संस्थांनी तारीखनिहाय भरलेल्या माहितीचा गोषवारा सदर प्रणालीमध्ये योग्य त्या तक्त्यात (Report) पाहण्याची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, विस्तार इमारत, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा चौक, मुंबई - ४०००३२, यांना माहितीसाठी सादर.

२) प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विद्यापीठ संचलित अभियांत्रिकी तंत्रनिकेतने यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी ईमेलव्दारे.

३) प्राचार्य, सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी / वास्तुकला अभ्यासक्रमांची तंत्रनिकेतने यांना माहितीसाठी ईमेलव्दारे.

*******

परिशिष्ट -ब

## School Connect School/ Organization Registration Information

- Organizing Institute Information

a) Organizing Institute Code.
b) Organizing Institute Name.
c) Type of School Connect.
d) MSBTE School Connect Approval Order No.
e) MSBTE School Connect Approval Date.
f) Amount Sanctioned by MSBTE.

- School Connect Information

a) Name of Participating School.
b) District.
c) Taluka.
d) Venue.
e) Date.
f) Local Publicity Medium.
g) Topic of Guidence.
h) Name-Post of Speaker.
 i) Speaker Name.
 ii) Speaker Post.
i) No. of Participants.
 i) Students.
 ii) Parents.
j) Name of Co-ordinator from School.
k) Contact No. of Co-ordinator from School.
l) Email of Co-ordinator from School..
m) Designation of Co-ordinator from School..
n) Name of School Principal.
o) Mobile no of Principal.